# MAHARASHTRA POLLUTION CONTROL BOARD

**Phone** : 0241-2470852
**Email** : sroahmednagar@mpcb.gov.in
**Visit us At** : www.mpcb.gov.in

"Your Service is our Duty"

**Sub Regional Office,**
Savitribai Fule vayapari sankul,
1st floor, Hall No. 2 & 3,
Near T. V. Centre, Savedi,
Ahmednagar - 414003.

REF. NO. MPCB/SRO/ANR/ 460 /2022. DATE : 09 / 12/2022.

**To,**
**The Joint Director (WPC),**
**Maharashtra Pollution Control Board,**
**Mumbai.**

**Sub** – Submission of Minutes of Public Hearing in respect of proposed 122 Sand Ghats in Tahasil Newasa, Shrigonda, Parner, Shevgaon, Sangamner, Shrirampur, Rahuri, Karjat, Jamkhed, Rahata & Kopargaon in 88 Villages of Ahmednagar District.

**Ref** – Office Order No. E – 88 of 2022 dated. 10/11/2022.

Sir,

Please find enclosed herewith minutes of Public hearing in respect of proposed 122 Sand Ghats in Tahasil Newasa, Shrigonda, Parner, Shevgaon, Sangamner, Shrirampur, Rahuri, Karjat, Jamkhed, Rahata & Kopargaon in 88 Villages of Ahmednagar District alongwith all relevant documents, videography and photographs for information & onward submission to the competent authority.

O/C

**(Chandrakant Shinde)**
**Sub Regional Officer**
**MPC Board, Ahmednagar.**

**D.A. :-** As above

**Copy submitted to : -**

1) The District Collector, Ahmednagar.
2) The Regional Officer, MPC Board, Nashik.

**Copy to :-** The District Mining Officer, Ahmednagar.

**अहमदनगर जिल्हयातील नेवासा, श्रीगोंदा, पारनेर, शेवगांव, संगमनेर, श्रीरामपुर, राहुरी, कर्जत, जामखेड, राहाता व कोपरगांव या तालुक्यातील ८८ गावांतील नदीपात्राच्या १२२ वाळु घाटांची प्रस्तावित वाळु उत्खनन करणेकरीता पर्यावरण विषयक जाहिर लोकसुनावणीचे इतिवृत्त.**

---

अहमदनगर जिल्हयातील नेवासा, श्रीगोंदा, पारनेर, शेवगांव, संगमनेर, श्रीरामपुर, राहुरी, कर्जत, जामखेड, राहाता व कोपरगांव या तालुक्यातील ८८ गावांतील नदीपात्राच्या १२२ वाळु घाटांची प्रस्तावित वाळु उत्खनन करणेकरीता पर्यावरण विषयक जाहिर लोकसुनावणी मंगळवार दिनांक २९ नोव्हेंबर, २०२२ रोजी सकाळी ११.०० वाजता पं. जवाहरलाल नेहरु सभागृह, जिल्हाधिकारी कार्यालय, अहमदनगर येथे आयोजित करण्यात आली होती.

भारत सरकारच्या पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालयाच्या अधिसुचना दिनांक १४-०९-२००६ व सुधारित अधिसुचना नुसार व सदस्य सचिव, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुंबई त्यांच्या कार्यालयीन आदेश क्रं. ई-८८/२०२२, दिनांक १०-११-२०२२ अन्वये खालीलप्रमाणे पर्यावरण विषयक जाहिर लोकसुनावणी समिती गठित करण्यात आलेली आहे :-

| | |
|---|---|
| १) जिल्हादंडाधिकारी, अहमदनगर,<br>किंवा त्यांचे प्रतिनिधी<br>(अतिरिक्त जिल्हादंडाधिकारी यांच्यापेक्षा<br>कमी दर्जाचा नसावा) | - **अध्यक्ष** |
| २) प्रादेशिक अधिकारी,<br>महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, नाशिक<br>(महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुंबई यांचे प्रतिनिधी) | - **सदस्य** |
| ३) उप प्रादेशिक अधिकारी,<br>महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ,<br>अहमदनगर | - **संयोजक** |

उप प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि.मंडळ, अहमदनगर तथा संयोजक, पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सर्वप्रथम प्रतिनिधी व उपस्थित असलेल्या स्थानिक जनतेचे स्वागत केले तसेच पर्यावरण विषयक जाहिर सुनावणीबाबत माहिती दिली. संयोजक यांनी पर्यावरण विषयक जाहिर लोकसुनावणीच्या प्रक्रियेबाबत माहिती दिली व मा. अध्यक्ष यांच्या अनुमतीने प्रकल्प प्रवर्तक (जिल्हा खनिकर्म अधिकारी, अहमदनगर) यांना प्रकल्पाच्या सादरीकरणाकरीता विनंती केली.

प्रकल्प प्रवर्तक व त्यांचे पर्यावरण विषयक सल्लागार यांनी प्रकल्पाबाबत, पर्यावरण विषयक व्यवस्थापन योजनेबाबत माहिती सादर केली. त्यानंतर संयोजक यांनी उपस्थितांना त्यांचे आक्षेप, हरकत, तक्रार, सुचना इ. मांडण्याची विनंती केली.

सदर पर्यावरण विषयक जाहिर लोकसुनावणी दरम्यान खालील मुद्दे उपस्थित करण्यात आले.

१) **<u>श्री. करीम जहाँगिर शेख - रा. श्रीगोंदा फॅक्टरी, ता. श्रीगोंदा, जि. अहमदनगर</u>**

श्री. शेख यांनी नमुद केले की, भीमा नदीचे बॅकवॉटर दौंड पर्यंत येत असल्यामुळे पाणी अटत नाही तर घमेले व खोरे, फावड्याने वाळु उपसा कसा करता येईल. तसेच भविष्यात लिलाव झाल्यानंतर वाळु उपशासाठी जे.सी.बी., पॉकलँडचा वापर करण्यात येऊन नियमांचे उल्लंघन झाले तर सर्वसामान्य नागरीक म्हणुन मी काय करु शकतो.

➢ **<u>प्रकल्प प्रवर्तक तथा जिल्हा खनिकर्म अधिकारी, अहमदनगर</u>**

प्रकल्प प्रवर्तक यांनी सांगितले की, सदर प्रस्तावित केलेले जे वाळु घाट पाण्याखाली असतील त्यांचे वाळु उत्खनन करता येणार नाही, जेव्हा सदर वाळु घाट हे उघडे पडतील / पाणी कमी झाल्यानंतरच त्यावेळेस वाळू उत्खनन करण्यात येईल. तसेच सदर वाळु घाटांची देखरेख ही जिल्हा प्रशासन व तालुका प्रशासनाकडून होणार असुन आपणास नियमांचे उल्लंघन होत असल्याचे आढळुन आल्यास जिल्हाधिकारी व तहसिलदार यांना कळवु शकता.

**२) <u>श्री. सचिन पाचपुते, रा. काष्टी, ता. श्रीगोंदा, जि. अ.नगर</u>**

श्री. पाचपुते यांनी नमुद केले की, गेल्या वर्षी जे लिलाव झाले होते त्यांचे यंत्राच्या सहाय्याने वाळु उत्खनन करण्यात आले होते त्याबाबत जिल्हा प्रशासनाकडे तक्रार करण्यात आलेली होती त्याची कोणतीही दखल घेण्यात आलेली नाही.

➢ **<u>प्रकल्प प्रवर्तक तथा जिल्हा खनिकर्म अधिकारी, अहमदनगर</u>**

प्रकल्प प्रवर्तक यांनी सांगितले की, सदर तक्रारीबाबतची दखल घेण्यात आलेली असुन तहसीलदारांकडे चौकशीकामी पाठविण्यात आलेली असुन त्याची चौकशी सुरु आहे. त्यावर नियमाप्रमाणे कारवाई करण्यात येईल व त्याबाबत आपणास अवगत करण्यात येईल.

**३) <u>श्री. संतोष अर्जुन धुमाळ, रा. काष्टी, ता. श्रीगोंदा, जि. अ.नगर</u>**

श्री. धुमाळ यांनी नमुद केले की, वाळु उत्खनन हे नदीपात्रामध्ये न करता शेतीमध्ये करण्यात आलेले होते. त्याबाबतचे चित्रिकरण करुन जिल्हा प्रशासनाकडे सदर चित्रिकरण पाठविण्यात आलेले होते. सदर शेतीमध्ये करण्यात आलेल्या उत्खननाबाबतचा पुरावा लिलाव धारकाने नष्ठ करण्यात आलेला आहे व जिल्हा प्रशासनाने सदर लिलावधारकावर कोणतीही कारवाई करण्यात आलेली नाही.

➢ **<u>प्रकल्प प्रवर्तक तथा जिल्हा खनिकर्म अधिकारी, अहमदनगर</u>**

प्रकल्प प्रवर्तक यांनी सांगितले की, प्रशासनाने सदर तक्रारीबाबतची दखल घेण्यात येऊन कारवाई करण्यात आलेली असुन अंतिम कारवाईबाबतचा अहवाल आपणास अवगत करण्यात येईल.

अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी उपस्थितांना काही आक्षेप, सूचना असल्यास त्या नोंदविण्याच्या सूचना केल्या. उपस्थितांकडून कोणताच प्रतिसाद मिळाला नाही.

अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सांगितले की, सदरहू बैठकीचे इतिवृत्त तयार करुन महाराष्ट्र शासनाच्या पर्यावरण विभागास सादर करण्यात येईल व त्यावर शासनाकडुन योग्य तो निर्णय घेण्यात येईल.

सयोजकांनी माननीय अध्यक्षांचे व उपस्थीत नागरिकांचे आभार मानून सुनावणी संपल्याचे जाहिर करण्यात आले.

**(चंद्रकांत शिंदे)**
संयोजक,
पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती
तथा
उप प्रादेशिक अधिकारी,
मप्रनि मंडळ,
अहमदनगर

**(हेमंत कुलकर्णी)**
प्रतिनिधी प्रादेशिक अधिकारी,
सदस्य,
पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती
तथा
क्षेत्र अधिकारी,
मप्रनि मंडळ,
नाशिक

**(राजेंद्रकुमार पाटील)**
अध्यक्ष,
पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती
तथा
निवासी उप जिल्हाधिकारी, अहमदनगर,
जिल्हा - अहमदनगर